**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.बी.के.जाजू
सुनीती भवन, श्री गणपती पंचायत संस्थान,
सांगली गणपती पेठ, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक (सामान्य-शाखा)
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२१ /सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१०.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.बी.के.जाजू
सुनीती भवन, श्री गणपती पंचायत संस्थान,
सांगली गणपती पेठ, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा सांगली श्री. किशोर तावडे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक (सामान्य-शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. डी. आर. कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७-१२-२००७ |

माहिती-मागणीच्या मूळ अर्जांच्या (जोडपत्र-अ) छायाप्रती सोबत जोडल्या आहेत.

## विवेचन

सांगलीच्या राजवाडा परिसरातील महसूल खात्याच्या ताब्यात असलेल्या विविध इमारती व जागा यांच्या मालकी बाबतची माहिती, तसेच या इमारतीचे भाडे अथवा हस्तांतर या संदर्भातील शासन व सांगलीचे राजे यांच्यामधील दि. ३०.४.१९५५ च्या पत्राची सत्यप्रत्य आदी माहिती आपण मागितली होती. परंतु दिलेली माहिती चुकीची व बेकायदेशीर आहे. त्याविरूध्द केलेले प्रथम अपील अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जि. सांगली यांनी माहितीची मागणी लक्षात न घेता फेटाळले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. बी. के. राजू यांचे प्रतिनिधी श्री. गोपाळ व्ही. कुलकर्णी यांनी लेखी निवेदनाद्वारे केले.

श्री. जाजू यांच्या मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली. जागा / इमारती हस्तांतराचा पत्रव्यवहार केंद्र शासन व राजे यांच्यात झालेला असल्यामुळे त्यांचे मूळ अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध नाहीत. तसेच श्री. जाजू यांनी अनेक मुद्दयांमध्ये खुलाशाची मागणी केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ते अभिप्रेत नाही, असेही त्यांनी कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक (सामान्य शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. डी. आर. कांबळे व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली श्री. किशोर तावडे यांनी केले.

अपीलकर्त्यांनी नेमक्या मागणीचे निवेदन आठ दिवसांत आयोगाला सादर करावे, त्याची प्रत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना द्यावी. त्यानंतर पुढील कार्यवाहीबाबत आदेश देण्यात येतील, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री. गोपाळ व्ही. कुलकर्णी यांनी दि. ३.११.२००९ रोजी निवेदन सादर केले. राजवाडा परिसरात महसूल खात्याच्या अखत्यारीतील इमारती व जागा यांच्या मालकीबाबतची कागदोपत्री कोणती माहिती उपलब्ध आहे, जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तरात उल्लेख केलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १०.१०.१९७९ च्या पत्राची सत्य प्रत अगर इमारती संदर्भातील सूची याची माहिती दिलेली नाही. मूळ अर्जातील 'खुलासा' या शब्दाचा तांत्रिक अर्थ लावून माहिती नाकारली आहे, असे या निवेदनात म्हटले आहे.

अपीलकर्त्याने केलेल्या मागणीनुसार संबंधित इमारतीची व जागेच्या मालकीबाबतची स्पष्ट माहिती शासनाच्या अनुषंगिक पत्रव्यवहाराच्या प्रतींसह अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. मात्र 'खुलासा' या शब्दाचा जन माहिती अधिकारी यांनी लावलेला संपूर्ण अर्थ तांत्रिक स्वरूपाचा आहे, असे म्हणता येणार नाही. स्पष्टीकरण, अभिप्राय, अन्वयार्थ अशा स्वरूपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याच्या मागणीनुसार राजवाडा परिसरातील महसूल खात्याच्या अखत्यारीतील शासकीय कार्यालय इमारती व जागा यांच्या मालकीबाबतची नेमकी माहिती अपीलकर्त्यास द्यावी, सोबत अनुषंगिक पत्रव्यवहाराच्या प्रती द्याव्यात. मूळ अर्जातील मुद्दा क्र. ड च्या अनुषंगाने विचाराधीन प्रस्तावाबाबतचा तपशील द्यावा.

वरीलप्रमाणे पूर्तता करून जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक (सामान्य शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांनी दि. ५.३.२०१० पर्यंत अहवाल आयोगाला सादर करावा.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ... पीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २०.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु. महागाव, पो. बावी, ता. बार्शी,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
उप सचिव,
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२६ /२०१०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.८.२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१३.८.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.९.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.८.११.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. शिवशंकर विश्वनाथ घोलप यांनी राज्य माहिती आयोगाने दि. १३.६.२००८ रोजी जारी केलेले सूचनापत्रक कोणत्या कायद्याच्या कलमान्वये जारी केले त्याची प्रत जन माहिती अधिकारी कक्ष अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव यांच्या पातळीवरुन व मिळाल्याने, तसेच सूचना पत्रकातील सूचना क्र. २ रद्द करण्याच्या मागणीसाठी आयोगाकडे अपील केले आहे.

'सूचना पत्रक' संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे उत्तर योग्य आहे, तसेच सूचना क्र.२ रद्द करण्याची मागणी मूळ अर्जात नसून अपिलात करणे योग्य नाही, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी लक्षात घेता ती 'माहिती' ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 26 FEB 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

४।१।१०
२।३।१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. शिवाजी सुकदेव लवटे
c/o श्री. काणे, महात्मा फुले नगर,
खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
शाळा समन्वय समिती,
सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ,
लोटेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२७/२०१०/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये मागणी करण्यात आलेली माहिती :-** सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व अनुदानित शाळांमधील शिक्षक -शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणुकीबाबतची माहिती | |

## विवेचन

अपिलकर्ता श्री. शिवाजी सुकदेव लवटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 26 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ. *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

४।३।१०
२।३।१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मज़ला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.चद्रकांत भिमराव शिंदे
मु.पो.रांजणी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
सांगली जिल्हा बहुउद्देशीय विकास बँक मर्या., सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१०.२००९ |
| ३. | उपस्थित<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, सांगली यांचे प्रतिनिधी श्री. बी. जी. पाटील,<br>सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगली | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२७.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br><br>सांगली जिल्हा बहुउद्देशीय विकास बँक मर्या., सांगली यांच्या कडील शेअर्स रक्कम परत मिळण्यासाठी दि. १२/११/२००७ रोजी पत्र दिले होते. या पत्राच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती. | |

## विवेचन

सांगली जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्यादित, मुंबई यांच्या कवठेमहांकाळ शाखेकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीनंतर शेअर्सची रक्कम परत मिळण्याच्या संदर्भात आपण केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री. चंद्रकांत भिमराव शिंदे यांनी जन माहिती अधिकारी तथा सचीव, सांगली जिल्हा बहुउद्देशीय विकास बँक मर्यादित, सांगली यांच्याकडे मागितली होती. शेअर्सची रक्कम कर्जाच्या शेवटच्या हप्त्यात समाविष्ट केली जाते, रोख दिली जात नाही, असे त्यांना कळविले. कर्जाच्या परतफेडीच्या वेळी बँकेच्या शेअर्सची रक्कम उणे असल्यामुळे शेवटच्या हप्त्यात जमा करणे किंवा परत करणे बंद होते व सध्याही बँक तोट्यात असल्याने ही रक्कम परत करता येत नाही, असे त्यांना स्पष्ट करण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सचीव, सांगली जिल्हा बहुउद्देशीय विकास बँक मर्या., सांगली यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. माहिती देण्यात आली असून शेअर्स रकमेबाबतची अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे, ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १८ .२.२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

कार्यवाह,
मिरज तालुका पेन्शनर्स असोसिएशन,
'चिंतामणी ' गोठण गल्ली , मिरज,
जि. सांगली

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी,**
सांगली (कुपवाड), सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३१/२०१०/सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१/८/२००९ |
| ३ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>वन विभाग जत, जि. सांगली येथील कर्मचा-यांच्या देय रकमा न दिल्याबाबतचा खुलासा | |

## विवेचन

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये अपील नागरिक व्यक्तीच्या नावे असणे आवश्यक आहे, संस्थेच्या नावे नाही. कार्यवाह, मिरज तालुका पेन्शनर्स असोसिएशन यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी उक्त अधिनियमाच्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. तसेच सदर अपिलासोबत नियमानुसार आवश्यक असलेले रु.२०/- चे मुद्रांक जोडलेले नाही.

सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रकाश मारूती पिसे
मु.पो.ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४५ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.११.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** — श्री. प्रकाश मारूती पिसे, मु.पो.ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा — तहसीलदार, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. समीर शिंगटे<br>**जन माहिती अधिकारी** तथा — निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. गुरू बिराजदार | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.३.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.०२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.३.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

हातकणंगले तालुक्यातील तलाठी, पुरवठा विभाग, गॅस एजन्सी आदी संदर्भातील माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले यांच्याकडे मागितली होती. माहिती एकत्र दिली नाही, तसेच चुकीची व खोटी दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. प्रकाश मारूती पिसे यांनी केली.

श्री. पिसे यांनी वेगवेगळ्या विभागांच्या संदर्भातील माहिती मागितली होती. या विभागाने कळवून त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाली त्यानुसार देण्यात आली. प्रामुख्याने सूचना, तक्रार, भाष्य व प्रशासकीय कार्यवाहीची अपेक्षा अशा स्वरूपाचे मुद्दे श्री. पिसे यांच्या अर्जात आहेत. तरीही त्याची उत्तरे दिली आहेत. 'भ्रष्टाचार होणारी क्षेत्रे व त्यावरील उपाय' अशा स्वरूपाची माहितीही श्री. पिसे यांनी मागितली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले श्री. गुरू बिराजदार यांनी केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' या संज्ञेत येणारी माहिती अपीलकर्त्याने मागितल्यास देण्यात येईल, आवश्यक ते अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून दिले जातील, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले श्री. समीर शिंगटे यांनी केले.

अपीलकर्त्याचा मूळ अर्ज पाहता बहुसंख्य मुद्दयांमध्ये भाष्य, तसेच प्रशासकीय कार्यवाहीची अपेक्षा याचा प्रामुख्याने समावेश आहे. अनेक विभागांकडील सरसकट माहिती त्यांनी मागितली आहे. ती लक्षात घेता दंडात्मक कारवाईची व दंडाच्या रकमेच्या वसुलीतून आपल्याला खर्चाची रक्कम मिळण्याची अपीलकर्त्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ... खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अरविंद बाबूराव मोहिते
१२१, ब/२, गंगापूरी, वाई, ता.वाई, जि.सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक,
भूमी अभिलेख सातारा, सातारा तहसील कंम्पाऊंड,
जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख सातारा, सातारा तहसील कंम्पाऊंड,
जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६३/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.०३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अरविंद बाबूराव मोहिते
१२१, ब/२, गंगापूरी, वाई, ता.वाई, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक,
भूमी अभिलेख सातारा,
सातारा तहसील कंम्पाऊंड,
जि.सातारा श्री.सतीश यादवराव भोसले

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख सातारा,
सातारा तहसील कंम्पाऊंड,
जि.सातारा श्रीमती लत्ता मारुती घरत

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.०४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.०५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.- |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.०७.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या लगतच्या जमीनीची मोजणी भूकरमापकांनी चुकीची केली असून त्याबाबतची कागदपत्रे आपल्याला दिलेली नाहीत. १५ दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख सातारा,सातारा श्री.सतीश यादवराव भोसले यांनी दिल्यानंतर पूर्वीचीच चुकीची माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,भूमी अभिलेख सातारा,सातारा तहसील कंम्पाऊंड,जि.सातारा श्रीमती लता मारुती घरत यांनी दिली व अतिक्रमण काढण्याबाबत जिल्हाधिकारी /प्रांताधिकारी /तहसीलदार यांच्याकडे अर्ज करावा, असे उत्तर दिले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.अरविंद बाबूराव मोहिते यांनी केले.

श्री.मोहिते यांना त्यांच्या स्वतःच्या गटाची मोजणी मान्य आहे. मोजणीप्रामणे जागेचा ताबा मिळावा, भूकरमापक श्री.एस.वाय.पाटील यांच्यावर कारवाई करावी, अशी त्यांची मागणी आहे. मूळ तक्रार मोजणीसंदर्भातील असल्यामुळे मोजणी पुन्हा केली. भूकरमापकांना एक वेतनवाढ रोखण्याची शिक्षा दिलेली आहे. अतिक्रमण काढण्याबाबत कोणाला अधिकार आहेत, याची माहिती दिली आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख सातारा,सातारा तहसील कंम्पाऊंड,जि.सातारा श्री.सतीश यादवराव भोसले यांनी केले.

श्री.मोहिते यांनी मूळ अर्जात भाष्य, स्पष्टीकरण याची, तसेच प्रशासकीय कार्यवाहीची मागणी केलेली आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तथापि भूकरमापकावर कारवाई करण्याची प्रशासकीय कार्यवाहीही अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख सातारा,सातारा तहसील कंम्पाऊंड,जि.सातारा यांनी केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : १८/०२/२०१०**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. शंकर धोंडीराम मांडवकर
फ्लॅट नं. ३०, गगनगिरी सह. गृह. संस्था,
भोसलेवाडी, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था,** **उत्तरवादी**
कोल्हापूर शहर, भुसारीवाडा,
बिंदू चौक, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा चेअरमन/सेक्रेटरी,**
गगनगिरी सह. गृह. संस्था,
भोसलेवाडी, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९७/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/७/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १/१२/२००८ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** गगनगिरी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भातील मूळ सभासद यादी, भूखंड वाटप, शासनमंजूरी तदनुषंगिक माहिती | |

**विवेचन**

सहकारी गृहनिर्माण संस्थाना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५६६६/२००७ प्रकरणी दिला असल्याने श्री. शंकर धोंडीराम मांडवकर यांचे सदरचे अपील दाखल योग्य ठरत नाही. उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर यांनी संस्थेचा ताबा घेण्याचा आदेश देण्याची अपिलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गणेश हरिश्चंद्र गोळे
मु.भोसे, पो.भिलार, ता.महाबळेश्वर, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, महाबळेश्वर,
जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, महाबळेश्वर,
जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गणेश हरिश्चंद्र गोळे
मु.भोसे, पो.भिलार, ता.महाबळेश्वर, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, महाबळेश्वर, जि.सातारा श्रीमती मिनल मिरजकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
महाबळेश्वर, जि.सातारा श्री.आर.एस.शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.११.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

फेरफार प्रकरणातील आपला मूळ अर्ज, जाबजबाबाच्या नकला आदी कागदपत्रे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, महाबळेश्वर, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, महाबळेश्वर, जि.सातारा यांच्या पातळीवर मिळाली नाहीत. ती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.गणेश हरिश्चंद्र गोळे यांनी केले.

श्री.पी.एस.इंगळे हे आधी जन माहिती अधिकारी होते. संबंधित कागदपत्रे मिळून येत नसल्याचे व माहिती संकलित करून देण्यात येणार असल्याचे श्री.इंगळे यानी कळविले होते. परंतु सन १९७७ मधील ही कागदपत्रे असून शोध घेऊनही अढळ होत नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, महाबळेश्वर, जि.सातारा श्री.आर.एस.शिंदे यांनी केले.

संबंधित कागदपत्रांच्या वर्गवारीनुसार जतनाच्या कालावधीबाबत स्पष्टीकरण करावे व त्यानुसार कागदपत्रे जतन केली नसल्यास जबाबदार कर्मचाऱ्याविरूध्द महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवावा, १५ दिवसात या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, महाबळेश्वर, जि.सातारा यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्त्याने

मागणी केलेली कागदपत्रे क वर्गातील म्हणजे ५ वर्षे जतनाची आहेत. महाबळेश्वर तालुक्यात दर वर्षी अतिवृष्टी होऊन थंड हवामानामुळे कागदपत्रे ओलसर व जीर्ण होतात व ती नष्ट करण्याशिवाय पर्याय उरत नाही. फेरफार पुस्तक नष्ट केले जात नाही. अपीलकर्त्याने मागणी केलेला फेरफार अलाहिदा त्यांना देण्यात आलेला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, महाबळेश्वर, जि.सातारा श्री.आर.एस.शिंदे यांनी दि.९.७.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. ते लक्षात घेता व जन माहिती अधिकाऱ्यांच्या या पत्रात नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास हिश्श्याबाबत आवश्यक तर दिवाणी न्यायालयात दाद मागण्याचा मार्ग उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २६.२.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रभाकर शं.साळुंखे
महालक्ष्मी अपार्टमेंट, फ्लॅट नं.२, पहिला मजला, जरगनगर जकात नाक्याजवळ,
पाचगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
उत्तरवादी

**१. जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
**२. जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.११.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, श्रीमती संगीता चौगुले<br>१ **जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, श्रीमती संगीता चौगुले<br>२ **जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, श्री. गुरू बिराजदार | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.११.२००८, १५.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.१.२००९ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मौजे पारगाव येथील सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत सन १९९६ पासूनची माहिती व संस्थेच्या लेखा परीक्षण आरोपाबाबत कारवाईची मागणी आपण केली, परंतु ती विलंबाने (अर्ज दि. ३.१०.२००८, माहिती दिली दि. १५.१२.२००८) देण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रारी करूनही दीड-दोन वर्ष कारवाई झाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. प्रभाकर शं. साळुंखे यांनी केली.

आपल्या कार्यालयाकडील उपलब्ध माहिती श्री. साळुंखे यांना त्वरित देण्यात आली. अन्य मुद्दयांची माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले यांना कळविले. परंतु त्यांनी दिलेल्या माहितीने श्री. साळुंखे यांचे समाधान न झाल्यामुळे तहसीलदार, हातकणंगले यांच्याकडून माहिती प्राप्त करून घेऊन श्री.साळुंखे यांना पुरविली. संबंधित सोसायटी शासनाच्या कब्जात घेण्यात आली आहे. श्री. साळुंखे यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची होती. अशी कार्यवाही करुन माहिती देणे अपेक्षित असल्यामुळे विलंब लागेल, असे त्यांना कळविले होते व त्यानुसार कारवाईबाबतची माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले श्री. गुरू बिराजदार यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. मात्र अर्जाच्या वेळची संबंधित प्रकरणातील वस्तुस्थिती विहित मुदतीत जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास कळविणे उचित ठरले असते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १८.२.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.उर्मिला विठ्ठल कुलकर्णी
द्वारा-९०२, श्रुतीश्री अपार्टमेंट, फ्लॅट नं.एफ-३, रविवार पेठ,
सोनटक्के तालमीजवळ, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, येरवडा, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, येरवडा, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.०६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.उर्मिला विठ्ठल कुलकर्णी
द्वारा-९०२, श्रुतीश्री अपार्टमेंट, फ्लॅट नं.एफ-३, रविवार पेठ,
सोनटक्के तालमीजवळ, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, येरवडा, पुणे
विद्यमान-श्री.ज.सं.संट, तत्कालीन-श्री.बा.श्री.नाईक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.४.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.२४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागणी केलेल्यातील लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर विभाग) सातारा यांनी माहिती दिली. परंतु लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर विभाग), पुणे यांच्याकडील माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या सौ.उर्मिला विठ्ठल कुलकर्णी यांनी केली.

सौ.कुलकर्णी यांनी मागितलेली माहिती लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर विभाग), सातारा यांच्या कार्यालयातील असल्यामुळे माहिती देण्याची सूचना सातारा कार्यालयाला देण्यात आली व त्यानुसार विहित मुदतीत सर्व माहिती सौ.कुलकर्णी यांना दिली, असे जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, येरवडा, पुणे श्री.ज.सं.संट यांनी नमूद केले. 'असे असेल तर' 'प्रश्न विचारला गेला असल्यास' अशा स्वरूपात सौ.कुलकर्णी यांनी माहिती मागितली आहे. गृहितावर वा अन्वयार्थावर आधारित विचारणा ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२६.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सदाशिव सखाराम पोवार — अपीलकर्ता
२६५१ डी, डांगे गल्ली, कोल्हापूर-२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाययक आयुक्त, क्रमांक १, — उत्तरवादी
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा प्र. कर आकारणी व वसुली अधिकारी
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्री. संजय शिवाजीराव भोसले

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. सदाशिव सखाराम पोवार<br>२६५१ डी, डांगे गल्ली, कोल्हापूर-२<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्र. कर आकारणी व वसुली अधिकारी<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर<br>श्री. संजय शिवाजीराव भोसले | |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.९.२००८, १८.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१०.२००८, १७.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

भोगवटा प्रमाणपत्र न देता वीज मंडळाच्या उपकेंद्राला त्यांचे नाव लावल्याबाबतची माहिती देताना कर आकारणीत मालकी हक्क रकाना रिकामा ठेवला आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सदाशिव सखाराम पोवार यांनी केली.

वीज मंडळाच्या उपकेंद्राबाबत याच विषयाच्या संदर्भात श्री. पोवार यांनी ४ अर्ज केले. दिलेल्या माहितीवर उपप्रश्न निर्माण करुन त्यांनी नवीन अर्ज दिले. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचे स्पष्टीकरण दिल्यानंतरही नवे उपप्रश्न त्यांनी निर्माण केले. वारंवार त्याच त्याच मुद्दयांवर ते पत्रव्यवहार करीत असून वेळोवेळी माहिती दिली आहे, असे जन माहिती अधिकारी व प्र. कर आकारणी व वसुली अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. संजय शिवाजीराव भोसले व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, क्र.१, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्रीमती शिल्पा नाईक यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. १८.२.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.इनामदार जाकीरहुसेन
१२ ब, डॉ.बापूजी साळुंखे नगर,
शिवराज पेट्रोलपपाजवळ, सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी (प.)
पंचायत समिती कोरेगाव, जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत ल्हासुर्णे, ता.कोरेगाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२१/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.०४.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता-** श्री.इनामदार जाकीरहुसेन, १२ ब, डॉ.बापूजी साळुंखे नगर, शिवराज पेट्रोलपपाजवळ, सातारा<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी (प.) पंचायत समिती कोरेगाव, जि.सातारा श्री.सी.एन.घारे<br>**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक, ग्रामपंचायत ल्हासुर्णे, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.जे.एन.काकडे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.- |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.९.०२.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६.०४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. तथापि जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत

ल्हासुर्णे, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.जे.एन.काकडे यांनी अर्जच न मिळाल्याचे कारण दाखवून माहिती दिली नाही. एकाच वेळी तीन वेगवेगळया ठिकाणी सुनावणीला जावे लागणार असल्याने हजर राहता येणार नाही, असे कळवूनही अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (प.), पंचायत समिती, कोरेगाव, जि.सातारा श्री.सी.एन.घारे यांनी अपील मुदतबाह्य ठरवून निकाली काढले. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी व माहिती नि:शुल्क द्यावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.इनामदार जाकीरहुसेन यांनी केली.

श्री.इनामदार यांचा अर्ज आपल्याकडे आलेला नाही. त्यांनी प्रथम अपील केल्यानंतर आपल्याला अर्जाबाबत कळले. त्यानंतर त्यांच्याकडून अर्जाची प्रत घेतली, व शुल्क कळविले. ते भरल्यास माहिती देण्यास तयार आहे. असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत ल्हासुर्णे, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.जे.एन.काकडे यांनी केले. श्री.इनामदार यांचे आरोप निराधार आहेत. त्यांचा मूळ अर्ज ग्रामपंचायतीकडे मिळालेला नाही. ही वस्तुस्थिती आहे. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत ल्हासुर्णे, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.जे.एन.काकडे यांनी माहिती नाकारलेली अथवा दडवलेली नाही. असे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (प.), पंचायत समिती, कोरेगाव, जि.सातारा श्री.सी.एन.घारे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत ल्हासुर्णे, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.जे.एन.काकडे यांनी सर्व अभिलेख उपलब्ध करुन देण्यास व आवश्यक माहिती देण्यास तयार असल्याचे स्पष्ट केले आहे. अपीलकर्त्याने माहिती आवश्यक असल्यास शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *)

**पुणे**
**दिनांक :** १८/०२/२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जनार्दन रामचंद्र तारू
द्वारा विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जनार्दन रामचंद्र तारू
द्वारा विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.रमेश चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.एन.एस.कुंभारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.१.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अव्वल कारकून या संवर्गात पदोन्नती देताना मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदांसंदर्भातील विभागीय पदोन्नती समितीचे इतिवृत्त आदी माहिती आपण प्रामुख्याने आपली पत्नी सौ.एस.जे.तारू यांच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने मागितली होती. सौ.तारू (सौ.एस.पी.झनकर) यांना मानीव तारीख मिळण्यासाठी अर्ज केला असून त्या संदर्भात ही माहिती हवी आहे, असे अपीलकर्ता श्री.जनार्दन रामचंद्र तारू यांनी नमूद केले.

सन १९९९ मधील इतिवृत्तांची मागणी श्री.तारू यांनी केली असून अभिलेखात त्याचा आढळ होत नसून पदोन्नतीचा अहवाल विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठविला असल्याचे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.एन.एस.कुंभारे यांनी नमूद केले.

इतिवृत्ताचा १५ दिवसात शोध घेऊन, तसेच सौ.तारू यांच्या अर्जासंदर्भातील कार्यवाहीबाबत अपीलकर्त्यास माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार सौ.तारू यांना विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी दि.२९.८.२००९ च्या आदेशान्वये अव्वल कारकून संवर्गातील मानीव दिनांक देण्याबाबतचा आदेश पारित केल्याचे संबंधित आदेशाच्या प्रतीसह अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी

कार्यालय, सातारा श्री.रमेश चव्हाण यांनी दि.१०.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. अपीलकर्त्याच्या मूळ मागणीची पूर्तता झाली असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सदाशिव सखाराम पोवार
२६५१ डी, डांगे गल्ली, कोल्हापूर-२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. सदाशिव सखाराम पोवार<br>२६५१ डी, डांगे गल्ली, कोल्हापूर-२ |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर<br>श्री. गणेश देशमुख |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | सहाय्यक संचालक, नगर रचना, कोल्हापूर<br>महानगरपालिका, कोल्हापूर<br>श्री. मधुकर यशवंत देवडे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.३.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

नगर विकास योजनेतील भूखंडाच्या क्षेत्रातील तफावतीच्या अनुषंगाने मागितलेली माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. सदाशिव सखाराम पोवार यांनी केली.

श्री. पोवार यांनी याच विषयासंदर्भात आतापर्यंत २० अर्ज केले आहेत. स्वतः केलेल्या अर्जांच्या नकलांची मागणी ते करीत असतात. वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. याच क्षेत्रातील तफावतीच्या तक्रारीबाबत संचालक; नगर रचना, मुख्यमंत्री आदींकडे त्यांनी मूळ तक्रारीसंदर्भात केलेली अपिले फेटाळण्यात आली आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक; नगर रचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. मधुकर यशवंत देवडे यांनी केले. मूळ अर्जानुसार माहिती दिली होती. अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. गणेश देशमुख यांच्या आदेशानंतर निःशुल्क माहिती देण्यात आली. तसेच आपल्या कार्यालयाकडील मूळ धारिका अवलोकनासाठी उपलब्ध असल्याचेही त्यांनी कळविले, असेही जन माहिती अधिकारी श्री. देवडे यांनी नमूद केले.

अपीलकर्ता वारंवार त्याच विषयासंदर्भात अर्ज व अपिले करीत असल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. दि. २०.६.२००३ चा अर्ज, महानगरपालिका आयुक्तांचे दि. ३१.३.२००४ चे पत्र पाहता दिलेल्या माहितीत विसंगती दिसते. त्यामुळे माहिती खोटी आहे, असे श्री. पोवार यांचे म्हणणे आहे. तथापि या बाबतचे स्पष्टीकरण त्यांना देण्यात आले असल्याचे कागदपत्रांवरुन दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. १८.२.२०१०

माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ